# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०५.१२.२०२५

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (२९.११.२०२५ ते ०५.१२.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०६.१२.२०२५ ते १०.१२.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | दिनांक | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.० | २८.८ | २९.५ | २९.४ | २९.० | ३०.४ | २८.५ | कमाल तापमान (अं.से.) | २८ | २९ | २९ | २९ | २८ |
| १३.७ | १३.० | १५.० | १५.५ | १५.७ | १८.२ | १९.५ | किमान तापमान (अं.से.) | २० | १९ | १८ | १६ | १५ |
| ० | ० | ० | ० | ४ | ८ | ८ | स. ढग स्थिती (आकाश) | ७ | ५ | २ | ० | ० |
| ० | ० | ० | ० | ० | ८ | ८ | दु. | | | | | |
| ६८ | ६५ | ७३ | ८१ | ८६ | ८० | ८९ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ६८ | ६४ | ४९ | ५२ |
| ४० | ५१ | ५० | ५३ | ५७ | ६६ | ६६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६२ | ५३ | ४८ | ४१ | ४२ |
| ४.४ | ३.५ | ३.१ | ३.७ | २.७ | ३.१ | २.९ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १३ | १२ | ९ | ९ | १० |
| पू. | पू. | द. | प. | पू.आ. | पू. | पू. | स. वाऱ्याची दिशा | पू. | पू. | पू.ई. | पू.ई. | पू.ई. |
| उ.ई. | ई. | उ.ई. | ई. | ई. | आ. | आ. | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२५ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२५पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० | १३६९.६ | ९५ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ६ व ७ डिसेंबर रोजी आकाश ढगाळ राहण्याची तसेच ८, ९ व १० डिसेंबर रोजी आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १० डिसेंबर पर्यंत कमाल तापमान २८.० ते २९.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमानामध्ये २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता असून किमान तापमान १५.० ते २०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ४९ ते ८०% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ४१ ते ६२% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०९ ते १३ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १० ते १६ डिसेंबर २०२५ दरम्यान पावसाची शक्यता नाही तसेच कमाल तापमान सामन्यत: सरासरी पेक्षा कमी तर किमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | **थंडीचे प्रमाण वाढल्यामुळे नागरीकांनी पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी**<br>➢ वृद्ध लोक आणि लहान मुलांची काळजी घ्यावी<br>➢ जास्तीती जास्त वेळ घरात राहावेप्रवास शक्यतो टाळावा .<br>➢ स्वेटर, मफलर, कानटोपी, पायमोजे हात मोजे घालावेत<br>➢ गरम पेय नियमितपने प्यावे<br>➢ हवामानाच्या अद्यावत महितीसाठी रेडियो ऐकावा, टिव्ही पाहावा तसेच वर्तमान पत्र वाचावे<br>**थंडीचे प्रमाण वाढल्यामुळे पिकांची पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी**<br>➢ थंडीपासून पिकाच्या बचावासाठी पिकास सायंकाळी हलके पाणी द्यावे<br>➢ केळीचे गुच्छ सच्छिद्र पॉलिथीन पिशव्याने झाकून ठेवा .<br>➢ उस तोड कामगार यांनी विशेष काळजी घ्यावी. थंडीच्या इशाऱ्या दरम्यान पहाटेच्या वेळी काम करणे शक्यतो टाळावे |
| संदेश | | ❖ **१० डिसेंबर पर्यंत किमान तापमानामध्ये २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वत:ची व आपल्या पशूधनाची काळजी घ्यावी** |
| गहू | फुटवे फुटने | ➢ गहू पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास (१० मावा किडीची पिल्ले किंवा प्रौढ प्रती झाड प्रति फांदी) त्यांच्या नियंत्रणासाठी जैविक घटकांमध्ये मेटारायझिअम ॲनिसोपली १.१५ डबल्यू पी, ४० ग्रॅम किंवा व्हर्टिसिलीअम लेकॅनी १.१५ डबल्यू पी, ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी घेवून १० ते १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.<br>➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्याने गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब हे बुरशीनाशक १.५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टर याप्रमाणात फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | वाढीची | ➢ किमान तापमान १५ अंश सेल्सिअस पेक्षा कमी झालेले असल्यामुळे वाढीच्या अवस्थेत ज्वारी पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.<br>➢ या किडीची पिल्ले व प्रौढ पानातील अन्नरस शोषण करतात व आपल्या शरीरातून मधासारखा गोड चिकट पदार्थ बाहेर टाकतात त्यावर काळी बुरशी वाढते (चिकटा रोग) त्यामुळे पिकाच्या अन्न तयार होण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो व परिणामी उत्पादनात घट |

| | | |
|---|---|---|
| | | होते.<br>➢ नियंत्रणासाठी ३० टक्के प्रवाही डायमेथोएट ५०० मी.लि ५०० लिटर पाण्यातून फवारावे.<br>➢ या किडीच्या नियंत्रणासाठी पिवळया रंगाचे चिकट सापळे एकरी ४ या प्रमाणात लावावे तसेच प्रादुर्भाव दिसताच ५% निंबोळी अर्काची फवारणी ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात करावी. |
| हरभरा | फुलोरा | ➢ हरभरा हे पिक पाण्यास अतिशय संवेदनशील असल्याने गरजेपेक्षा जास्त पाणी दिल्यास पिक उभळते त्यामुळे उत्पादनात मोठी घट येते. तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब केल्यास पिकाला पाहिजे तेवढे आवश्यक त्या वेळेला पाणी देता येते, या पद्धतीमध्ये जमीन नेहमी भूसभुसित राहून कायम वाफसा राहिल्यामुळे खते, अन्नद्रव्ये पूर्णपणे उपलब्ध होतात व परिणामी उत्पादनात चांगली वाढ होते. त्यामुळे हरभरा पिकास पाणी देण्यासाठी तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. |
| ऊस | वाढीची | ➢ डिसेंबर महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ३.६३ मिमी प्रती दिवस एवढा असतो ऊस पिकास दररोज २.१७ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ३३ मिनिटे चालवावा. |
| आंबा | नवीन पालवी | ➢ मागील आठवड्यामध्ये काही ठिकाणी अंशत: ढगाळ हवामान राहिल्यामुळे आंब्यावरील तुडतुड्यांच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारायझियम ॲनीसोप्ली १.१५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी (१x १०९ बिजाणु प्रती ग्रॅम) ५० ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून पहिली फवारणी फुलोरा येण्यापूर्वी तसेच गरजेनुसार फुलोऱ्यात असताना २ ते ४ फवारण्या आठवडयाच्या अंतराने कराव्यात |
| टोमॅटो | फळ धारणा | ➢ कमाल तापमान २८ ते ३० अंश सेल्सियस दरम्यान राहण्याची असल्याने टोमॅटो पिकावर फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी पिकावर नोवाल्युरोन १०% ई.सी. किंवा क्लोरॅनट्रनीलीप्रोल १८.५ एस.सी. ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| वांगी | फळ धारणा | ➢ मागील आठवड्यातील कमाल व किमान तापमानातील चढ उतार तसेच हवेमध्ये असलेल्या जास्त आद्रतेमुळे वांग्यावर शेंडे पोखरणारी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. अळी प्रथमतः झाडावर फळे नसताना कोवळया शेंड्यात शिरून आतील भाग खाते. त्यामुळे शेंडे वाळतात. नंतर फळे आल्यावर फळात शिरुन आतील भाग खाते. त्यामुळे अशा फळांना बाजारात किंमत मिळत नाही.<br>➢ किडीमुळे फळांचे ४०-५० टक्के नुकसान होवू शकते.<br>➢ नियंत्रणासाठी लागवडीनंतर २० दिवसांनी दर आठवड्याला किडलेले शेंडे व फळे आढळल्यास ती गोळा करून नष्ट करावीत किंवा खोल खड्ड्यात पुरून टाकावी तसेच ५ टक्के निंबोळी अर्क किंवा स्पीनोटोरम ११.७० एस.सी. ५ ते ७ मिली किंवा क्लोरोपायरीफॉस २०% ई.सी. २० मिली. किंवा स्पिनोसॅड ४५% एस.सी. ४ मिली प्रति १० लिटर पाण्यातून साध्या हातपंपाने फवारावे. शेतामध्ये फळ पोखरणाऱ्या अळीसाठी एकरी ४० कामगंध सापळे (फनेल टाईप) वापरावेत. |
| भेंडी | फळ धारणा | ➢ मागील आठवड्यामध्ये अंशत: ढगाळ हवामान राहिल्यामुळे भेंडी पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम १० ग्रॅम किंवा हेक्झाकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कांदा | कंद विकसित होणे | ➢ मागील आठवड्यामध्ये अंशत: ढगाळ हवामान राहिल्यामुळे कांदा पिकावर काही ठिकाणी करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी डायफेनकोनॅझोल २५% ई.सी. १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| पशुधन | वाढीची | ➢ रात्री जनावरे गोठ्यात बांधावीत आणि त्यांना थंडीपासून बचावासाठी कोरडी उबदार जागा उपलब्ध करून द्यावी<br>➢ थंडीचा सामना करण्यासाठी व जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी आहारात पुरेसे प्रथिने आणि खनिजे द्यावीत<br>➢ रात्रीच्या वेळी जनावरे / बकरीना उघड्यावर ठेवू नका. |
| कुक्कुटपालन | वाढीची | ➢ पुढील ५ दिवस किमान तापमान १५ ते २० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता असल्याने पोल्ट्री पक्ष्यांचे थंडीपासून बचावासाठी पोल्ट्री शेड मधील तापमान रात्रीच्या तसेच पहाटेच्या वेळी उबदार राहील याची काळजी घ्यावी |

| मेघदूत | दामिनी |
|---|---|
| ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : ०५.१२.२०२५

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर